महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे विभाग,पुणे
१७ डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-४११००१
ई-मेल- dydpune@gmail.com वेबसाईट- WWW.dydepune.com
दूरध्वनी क्र.०२०- २६१२२२१७

जा.क्र.शिउसं/एनएसएस/२०१७-१८/उमाशि४/बैठक/ दि. ०८/०२/२०१८.

प्रति,
प्राचार्य / समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना+2 स्तर राबविणारे
सर्व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ,सोलापूर, अहमदनगर.

विषयः- राष्ट्रीय सेवा योजना + २स्तर बाबत
सन २०१७-१८ राज्यस्तरीय आढावा बैठकीचे आयोजनाबाबत.

---

बैठक :- दि.१६/०२/२०१८ मंगळवार, स. ११.०० ते सायं.०४.०० वा.
स्थळ :- नेस वाडिया महाविद्यालय, रुबी हॉलजवळ, पुणे

वरील विषयी आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र राज्यस्तरावरील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणारे राष्ट्रीय सेवा योजना +२स्तर सन २०१७-१८ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना + २स्तर चे राज्यस्तरीय नियोजन / आढावा बैठकीचे आयोजन करणेबाबत मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेशित केले असल्याने, नेस वाडिया महाविद्यालय, रुबी हॉलजवळ, पुणे येथे दि. १६/०२/२०१८ मंगळवार रोजी स. ११.०० ते सायं.०४.०० वा. बैठक घेणेबाबत निश्चित केले आहे.

बैठकीस मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा. पुणे योजनेबाबत स्वतः आढावा घेणार असून मार्गदर्शन करणार आहेत तसेच राज्यस्तरावरील / विभागीय स्तरावरील शिक्षण विभागाचे अधिकारी / कर्मचारी, एन एस एस योजनेचे राज्य / विभागीय समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, यांची उपस्थिती आवश्यक असल्याने, बैठकीस कमविचे प्राचार्य / कार्यक्रम अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे. कृपया कोणीही अनुपस्थित राहू नये, तसेच बैठकीस येतांना खालीलप्रमाणे नमूद केलेली माहिती न चुकता सोबत आणावी.

माहितीचा तपशिल

१.त्रैमासिक/सहामाही कामाचा अहवाल सादर करणे.
२.विशेष हिवाळी शिबीरामधील दत्तक गावाचा पुढील तीन वर्षाचा विकास आराखडा **Development Plan / Action Plan.** सद्यस्थितीसह सादर करावा.
३.१२ ते १७ जानेवारी युवा सप्ताह सादर करणेबाबत नियोजन सादर करणे.
४.पुढील उर्वरीत कालावधीमधील एप्रिल २०१८ कामांचे नियोजन सादर करावे.
५.सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात एन एस एस योजनेंतर्गत प्रविष्ठ विद्यार्थ्यांची यादी

सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे करिता

प्रत :- १. मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा. पुणे १.
२. श्री.पी.एम.सांबारे, विभागीय समन्वयक, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे तसेच जिल्हा समन्वयक पुणे श्री.सुर्यवंशी / जिल्हा समन्वयक अहमदनगर श्री.रहाणे / जिल्हा समन्वयक सोलापूर श्री.राख.